Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614291
cmmedia@mahabank.co.in

**प्रसिद्धीसाठी**

# बँक ऑफ महाराष्ट्रने कोरोना महामारीच्या काळात एमएसएमई उद्योगांना रु. 2779 कोटींचे कर्ज मंजूर केले.

**पुणे, 8 जुलै, 2020:** देशातील प्रमुख सार्वजनिक क्षेत्रातील ग्राहकोन्मुख बँक ऑफ महाराष्ट्रने (बीओएम) एमएसएमई क्षेत्रातील उद्योगांना 2779 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले असून त्यातील 2327 कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले आहे.

लॉकडाउन जाहीर झाल्यापासून बँक ऑफ महाराष्ट्रने ग्राहकांना आर्थिक तरलतेवर मात करण्यासाठी विविध योजनांद्वारे मंजूर मर्यादेपेक्षा अतिरिक्त कर्ज पुरवठा केलेला आहे. कोविड-19 अंतर्गत एकूण 1,08,419 कर्जदारांना रुपये 1,65,316 लाख कर्ज मंजूर केले आहे. इसीएलजीएस येजनेंतर्गत 84,151 ग्राहकांना 1,72,498 लाख रुपयांचे कर्ज तर एसएलसी योजनेंतर्गत 30 ग्राहकांना 1,128 लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रने योजनांविषयी ग्राहकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी वेबिनार, एसएमएस, ईमेल, टेलि कॉलिंग इत्यादी माध्यमातून विविध उपाय योजना राबविल्या आहेत.